# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 23-08-2016 रोजी (का.प.क्र.05) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक 23 ऑगस्ट 2016 रोजी (का.प.क्र .05) मा.सभापती श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 12-30 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.उपआयुक्त (प्र.) श्री.रविंद्र निकम नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| 2. | स.स.श्री.नितीन रमन चित्ते |
| 3. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 4. | स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| 5. | स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे |
| 6. | स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| 7. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 8. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 9. | स.स.श्री.शेख समीना शेख इलियास |
| 10. | स.स.श्री.अजीम अहेमद रफिक |
| 11. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 12. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |

श्री.कैलास गायकवाड : मनपाचे लेखाधिकारी श्री.संजय पवार यांनी पीएचडी ही पदवी प्रदान केली त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करावे.

श्रीमती किर्ती शिंदे : रिओ ऑलपिंक रौप्य विजेत्यांचे या सभागृहाच्या वतीने अभिनंदन करावे.
या प्रस्तावास स.श्री. विकास एडके श्रीमती मनिषा मुंढे यांनी अनुमोदन दिले.

मा.सभापती : ठिक आहे श्री.संजय पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात येते त्यांनी डायसजवळ यावे. तसेच रिओ ऑलपिंक विजेत्याचे अभिनंदन करण्यात येते.
यावेळी मा.सभापती यांनी श्री.संजय पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

श्री.सिताराम सुरे : आजच्या बैठकीला मा.आयुक्त अति.आयुक्त नाही इतर अधिकारी सुध्दा उपस्थित नाही आमच्या प्रश्नाचा खुलासा घेण्यास कुणीही नाही आजची सभा तहकूब करावी.

श्रीमती समीना शेख : मागिल बैठकीत काही अधिकारी अनुपस्थित होते त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन कार्यवाही करणार होते. काय कार्यवाही केली व त्या अधिका-यांचा काय खुलासा आला माहिती दयावी.

श्री.विकास एडके : जेव्हा सभेसाठी अधिकारी मा.आयुक्त उपस्थित असु शकतील तेंव्हा ही सभा आयोजित करावी आता तहकूब करावी.

श्री.मकरंद कुलकर्णी : 15-20 दिवसाला एक बैठक होते त्यातही अधिकारी उपस्थित नसतात हे योग्य नाही अधिकारी असतील तेंव्हा बैठक घ्यावी.

| | |
|---|---|
| श्री.अजीम अहेमद | : मा.आयुक्त नाही, अतिरिक्त आयुक्त असतात तेही आज उपस्थित नाही सर्व अधिकारी असतील तेव्हा सभा घेण्यात यावी. |
| श्री.कैलास गायकवाड | : सदस्यांची सुचना विचारात घेऊन सभा तहकूब करावी. |
| मा.सभापती | : शहराच्या विकासा संदर्भात अनेक प्रश्न आहे. अधिकारी सभेला उपस्थित नसतील सभा घेऊन अर्थ नाही अति.आयुक्त सभेला असतात तेही आज नाही सभागृहाने घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी होत नाही.सभेला मा.आयुक्त अति.आयुक्त व इतर संबधीत अधिकारी उपस्थित असतील त्यावेळी सभेचे आयोजन करण्यात येईल. आजची सभा तहकूब करण्यात येते. |

या बरोबर आजची सभा तहकूब केल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद